| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ८०७ /२०२५ दिनांक :- ३० /०१/२०२५

**प्रसिद्धिपत्रक**

गणेशखिंड रोडवरील, पुणे विद्यापीठ चौक ते शिवाजीनगर कोर्ट दरम्यान टाटा मेट्रोचे काम सुरु आहे. सदर काम तात्काळ व विनाअडथळा होण्यासाठी गणेश खिंड रोड वरील Gantry Foundation at PMR 20 चे कामासाठी तसेच सामान ने आण करणेसाठी संगण्णा धोत्रे मार्गा वरील वाहतुकीत बदल करणे आवश्यक आहे.

गणेशखिंड रोडवरील टाटा मेट्रोच्या दुमजली उड्डाण पुलाचे बाणेर रॅम्पचे बांधकामा तसेच PMR २० चे कामासाठी वाहतूक सुरळीत व सुरक्षित सुरु राहण्याकरीता व वाहतूक कोंडी होवु नये म्हणुन वाहतूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, दिनांक २८/०१/२०२५ पासुन पुढील आदेशापर्यंत वाहतूकीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे बदल करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील. –

**चतु:श्रृंगी वाहतुक विभाग अंतर्गत**

➢ **संगण्णा धोत्रे मार्ग हा वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.**

सदर मार्गावरील वाहतुक थोरात चौक - सरळ दिप बंगला चौक - उजवी कडे वळुन - ओम सुपर मार्केट - सरळ सिम्बॉयोसिस कॉलेज चौक - सरळ खाऊ गल्ली मार्गे गणेशखिंड रोड मार्गे इच्छित स्थळी जावे.

(नागरीकांनी वरील पर्यायी मार्गाचा वापर करावा तसेच वाहतुक कर्मचारी / स्वयंसेवक यांना सहकार्य करावे. )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २) **पोलीस आयुक्त सो,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी.

५) **प्रभारी अधिकारी चतुश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर**